म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा० वा०
दा. क्र. ५९७



म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
क्र.

IRBK-0108811

# शिकलेले पोर

— शं. बा. भोसले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

910 ९१० C C99

* नवसाक्षर प्रौढासाठी *

# शिकलेले पोर

: लेखक :

शं. बा. भोसले

किंमत २५ नये पैसे

म. ग्रं. ठाणे. ग्रंथालय शाखा.
क्र. CC99 नों दि ........
वि. ९१० ९२०

प्रथम श्रेणी

IRBK-0108811

विद्या प्रकाशन
४५० बुधवार पेठ, पुणें २.

# ... शिकलेले पोर ...

## ** अनुक्रमणिका **


| | | |
|---|---|---|
| १ | आनंदा शेतकी शिकला | ३ |
| २ | मी शेतीच करणार | ४ |
| ३ | नवी चढाओढ | ७ |
| ४ | सुधारलेली शेती | ९ |
| ५ | पैज जिंकली | ११ |



●● प्रकाशक ●●

व्ही. आर. शिगरे,
विद्या प्रकाशन,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

●● मुद्रक ●●

व्ही. आर. शिगरे,
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

# शिकलेले पोर

अनुक्रम 30995
विभाग 2214
ग्रंथांक
नों. दि.
नालय

## : १ :

## आनंदा शेतकी शिकला

जानू पाटलाचा आनंदा फार हुशार.
शेतकी शाळेची परीक्षा तो झटक्यात पास झाला.
तो घरी आला.
तेव्हां जानूला केवढा आनंद झाला !
ज्याला त्याला तो पोराचे कौतुक सांगायचा.
जानूची बायको आयाबायाजवळ सांगू लागली,
" माझा आनंदा नोकरी करणार.
आता तो साहेब होणार.
मायंदळ पैसे मिळविणार. "

पण आनंदाचा बेत वेगळाच होता.
शिकलेली बेकार मुले त्याच्या डोळ्यापुढे होती.
आपणही नोकरीमागे लागायचे काय ?
आपली सोन्यासारखी शेती आहे.
ती सोडून नोकरी करायची काय ?
शेतीपरते सुख नाही.
यावर त्याचा विश्वास होता.
नोकरीपेक्षा शेतीच चांगली.

: २ :

# मी शेतीच करणार



जानूची शेती फारशी नव्हती.
कोकणातील जमीन-
तीत पिकायचेही थोडेच.
जानू लोकांच्या शेतावर राबायचा.
बायकापोरांची गुजराण करायचा.
आनंदाने ठरविले, शेतीच करायची.
नव्या पद्धतीने शेती करायची.
आहे त्याच जमिनीतून दुप्पट पीक काढायचे.

जानूस वाटे पोराने लौकर नोकरी बघावी.
आनंदाच्या आईलाही तसेच वाटे.
एक दिवस ते दोघे त्याला म्हणाले,
" बाळ, नोकरीचा तलास लौकर लाव.
नोकरी लागली की लगीन उरकायचंय. "
आनंदा म्हणाला,
" नोकरी नको.
सोन्यासारखी शेती आहे.
तीच मी करणार आहे. "

जानूला राग आला.
त्याचे सारे बेत ढासळले होते.
तो चिडून म्हणाला,
" शेतीच करायची तर शिकलास कशाला ?
पोराबाळास्नी उपाशी ठेवलं.
आन् तुझ्या शिकण्याला पैसा घातला.
त्याचा ह्योच उजेड पाडलास व्हय ? "

आनंदा शांतपणे म्हणाला, " बाबा शिकल्यावर नोकरीतच पैसा मिळतो असं नाही.
माझ्या शिक्षणाचा उपयोग शेतीला होईल.
आपण नक्की सुखी होऊ. "

आनंदाची आई मध्येच म्हणाली,
"आपलं टीचभर शेत.
त्यात पिकवणार काय दगड ?
आन् खाणार काय माती ?"

आनंदा म्हणाला,
"पण माझं ऐका.
तुम्ही दोघेही स्वस्थ बसा.
कांही करू नका.
माझे मी सारे करतो.
नोकरी इतकाच पैसा मिळवून दाखवितो.
मग तर झालं !"

शिकलेल्या पोरापुढे दोघाना जास्त बोलता येईना.
ते गप्प बसले.

: ३ :

# नवी चढाओढ

सरकारने धान्याची चढाओढ जाहीर केली.
पहिल्या नंबरास एक हजार रुपये रोख.
शिवाय चांदीची ढाल बक्षीस.

आबासाहेब इनामदारानी चढाओढीत नाव दिले.
रामजी जाधवानीही नाव दिले.
बाबूराव देशपांड्यानीही नाव दिले.
सारेच मोठे जमीनदार.
लहानसान शेतकरी धजलेच नाहीत.
आनंदानेही ठरविले.
चढाओढीत भाग घ्यायचा.

पण जानू तयार होईना.
मोठ्या जमिनदाराना तो बुजला होता.
आनंदाने त्याची समजूत घातली.
जानूचे नाव चढाओढीला गेले.
ते पाहून गावकरी हसले.

कोणी म्हणाले,
" पोटापुरतं दाणं पिकिव आधी ! "

जमिनदारानींहि जानूला हिणविले.
ते म्हणाले,
" आमची बरोबरी करणं लई कठिण. "
कारण त्यांच्या जमिनी नंबरी होत्या.
बागायती होत्या.

जानू नाराज झाला.
तो आनंदाला म्हणाला,
" चढाओढीला एवढे जमिनदार हैती.
मग आमचं ठिगाळ कुठं लागणार ?
आपल्या तुकड्यात पिकून पिकून किती पिकणार ?
बेडकी फुगली म्हणून काय, बैलाएवढी व्हईल ? "

आनंदा बोलला,
" चढाओढीचं कांही का होईना.
आपण करवतील तेवढे कष्ट करू या म्हणजे झालं.
बक्षीस मिळाले नाही तर नाही.
शेतातले दाणे तर कोणी नेणार नाही ना ? "

: ४ :


# सुधारलेली शेती

आनंदा शेतकी शाळेत शिकलेला होता.
शेतीच्या नव्या नव्या पद्धतींचा अभ्यास केला होता.
त्याने नव्या पद्धतीने शेती सुरू केली.
जानू मदतीला होताच.

त्यानी जमिनीची खोल नांगरट केली.
कुळवणीहि चांगली केली.
पावसाळा आला.
आनंदाने भाताचे चांगले बी निवडले.
त्याची रोपे केली.
ती वितीच्या अंतराने लावली.
शेतात वितीचे चौक तयार झाले.

पाऊस पडला.
रोपे उगवली.
प्रत्येक चुडात चार पाच रोपे होती.
त्यातील मरतुकडी रोपे उपटून टाकली.
चांगली नेटाची तेवढीच ठेवली.

खतं भरपूर घातली.
चिखल कोळपणी केली.



रोपांच्या चुडामध्ये भरपूर अंतर होते.
त्यामुळे त्यांची वाढ चांगली झाली.
रोग पडू नये म्हणून पिकावर औषधे मारली.
जानू पोराचे कसब बघत होता.
त्याला नवल वाटत होते.

३०११५११
बा.वा.
२२१५
४।४।५१.

: ५ :

# पैज जिंकली

पिकाच्या चढाओढीचे अधिकारी आले.
इनामदारांच्या शेताची कापणी आधी झाली.
त्यांचे भात, एकरी १३० बंगाली मण निघाले.
देशपांडे व जाधवांचे सव्वाशे मणातच आटपले.
इनामदाराना खूप आनंद झाला.
त्याना वाटले आपण जिंकली !

जानूची कापणी व्हायची होती.
अधिकारी तिकडे निघाले.
इनामदार त्याना म्हणाले,
" साहेब त्याच्या शेतावरच कशाला जायला पाहिजे ?
शंभर मणसुद्धा भात निघायचे नाही.
उगाच कशाला त्रास घेता ?
लिहा इथेच आकडा ! "

अधिकारी म्हणाले,
" तेथे जाऊनच कापणी करू.
मग प्रत्यक्ष आकडा घेऊ. "

६८९७

जानूचे उभे पीक बघताच सारे दचकले.
अधिकाऱ्याना आनंद वाटला.
लोंब्या लांबसडक आणि भरदार.



कापणी सुरू झाली.
अर्ध्या एकरातच ८० मण भात भरले.
सबंध एकराचे १६२ मण भात झाले !
जानूचा पहिला नंबर लागला.
अधिकाऱ्यानी जानूला धन्यवाद दिले.
पण जानू म्हणाला,
" या मानाचा मानकरी हा माझा आनंदा होय.
त्याने ही नव्या पद्धतीने शेती केली.
म्हणूनच एवढं भात पिकलं ! "

IRBK-0108811

३०११५



( महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीच्या सौजन्यानें )


●● प्रकाशक ●●
व्ही. आर. शिगरे,
विद्या प्रकाशन,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

●● मुद्रक ●●
व्ही. आर. शिगरे
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार पेठ, पुणें २.